वार्षिक तपासणी कार्यक्रम.
सन.२०१७-१८

नाशिक जिल्हा परिषद नाशिक
जा.क्र.साप्रवि/तपासणी/ २५५ /२०१७
नाशिक दि. २५/०८/२०१७

**विषय** :-- सन.२०१७-१८ मध्ये जिल्हा परिषद खाते प्रमुख व पंचायत समिती कार्यालय तपासणी कार्यक्रम....

महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जल संधारण विभाग मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र .झेडपीएम/११८३/११२७/(३०४१)/२००५ दिनांक.०७/०८/१९८३ नुसार सन.२०१७-१८ मध्ये खालील प्रमाणे जिल्हा परिषद खाते प्रमुख कार्यालयाची व व पंचायत समिती कार्यालयाची वार्षिक तपासणी मुख्य कार्यकारी अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) जिल्हा परिषद नाशिक हे करणार आहेत. तरी आपले कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना या बाबतंच्या लेखी सूचना देण्यात याव्यात. तपासणी कामी आवश्यक असलेले माहितीचे तक्ते दोन प्रतीत एक महिना अगोदर जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभागातील संबंधित तपासणी संकलनाकडे समक्ष सादर करावेत.

| अ.क्र. | तपासणी वर्ष | तपासणी महिना | पं.स.कार्यालय तपासणी अधिकारी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुख्य कार्यकारी अधिकारी | | उपमु.का.अ.(साप्रवि) |
| | | | खाते प्रमुख | तालुका | |
| १. | २०१६-२०१७ | एप्रिल.२०१७ | --- | -- | -- |
| २. | | मे.२०१७ | | -- | -- |
| ३. | | जुन.२०१७ | -- | -- | -- |
| ४. | | जुलै.२०१७ | शिक्षण (प्रा)/आरोग्य | -- | कळवण |
| ५. | | ऑगष्ट.२०१७ | इवदद क्र.१ | नाशिक | चांदवड/निफाड |
| ६. | | सप्टेंबर.२०१७ | इवद क्र.३ | मालेगांव | पेठ |
| ७. | | ऑक्टोबर.२०१७ | समाज कल्याण | सुरगाणा | देवळा |
| ८. | | नोव्हेंबर.२०१७ | कृषि/ल.पा.पश्चिम/ | नांदगांव/दिंडोरी | - |
| ९. | | डिसेंबर २०१७ | इवद.क्र.२/शिक्षण (मा.) | येवला/सटाणा | |
| १०. | | जानेवारी.२०१८ | लपा (पूर्व)/ | सिन्नर | |
| ११. | | फेब्रुवारी.२०१८ | पशूसंवर्धन | | |
| १२. | | मार्च.२०१८ | एबाविसेयो. | | |

वरील प्रमाणे सर्व खाते प्रमुख कार्यालयाची व पचायत समिती कार्यालयाची वार्षिक तपासणी करण्यात येईल. तसेच मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक हे सन.२०१७-१८ मध्ये पंचायत समिती इंगतपूरी/त्र्यंबकेश्वर या कार्यालयाची तपासणी करणार असल्याने सदरचे पंचायत समितीची तपासणी चालू आर्थिक वर्षात जिल्हा परिषदेकडून करण्यात येणार नाही.

तपासणी कामी आवश्यक असणारे सर्व कागदपत्रे,मुळ सेवा पुस्तके व सर्व नोंदवहया अद्यावत करण्यात याव्यात तसेच तपासणी कामी आवश्यक असणारी माहिती वेळीच देण्याची दक्षता घ्यावी व या बाबत सर्व संबंधितांना सक्त सूचना देण्यात याव्यात.

तसेच ज्या खाते प्रमुख तसेच पंचायत समिती कार्यालयाकडे मागील प्रलंबित मुदयांचे अनुपालन तयार करुन तपासणी पथकास दप्तर दाखवून स्विकृती बाबत कार्यवाही करुन घ्यावी.

गट विकास अधिकारी यांनी पंचायत समिती अधिपत्याखालील सर्व अधिकारी उदा.उप अभियंता,इवद/ल.पा./ग्रापापु/गट शिक्षणाधिकारी,पशूधन विकास अधिकारी ,वैद्यकीय अधिकारी,बाल विकास प्रकल्पाधिकारी ,तालुका वैद्यकीय अधिकारी, इ. यांना लेखी सूचना देण्यात याव्यात.

तपासणी बाबतच्या सविस्तर तारखा त्या त्या वेळी अलहिदा कळविण्यात येतील. तपासणी कालावधीत कोणत्याही अधिकारी व कर्मचा-यांची गट विकास अधिकारी यांचे पूर्व परवानगी शिवाय रजेवर अथवा फिरतीवर जाऊ देऊ नये याची दक्षता घ्यावी.

२५/०८

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**प्रति,**
**खाते प्रमुख ------------(सर्व)**
**जिल्हा परिषद नाशिक.**
**गट विकास अधिकारी,(सर्व)**
**पंचायत समिती**
**प्रतिलिपी-**
**बाल विकास प्रकल्पाधिकारी ए.बा.वि.से.यो. (सत्र)**
**उप अभियंता (लपाइवद/ग्रापापु)उप विभाग (सर्व)**
**गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती (सर्व )**
**पशूधन विकास अधिकारी पंचायत समिती (सर्व)**
**२/- यांचेकडेस माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीस्तव रवाना.**
**प्रत :- मा.विभागीय आयुक्त,नाशिक विभाग नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.**
**प्रत :- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नाशिक यांचे वैयक्तिक कार्यालयास माहितीस्तव सादर**

# सामान्य प्रशासन विभाग,
# नाशिक जिल्हा परिषद, नाशिक

दुरध्वनी - ०२५३-२५९१०१० / फॅक्स- ०२५३-२५०८३८९ / ईमेल- gadzpnsk@gmail.com


---

नाशिक जिल्हा परिषद,नाशिक
जा.क्र.साप्रवि/आस्था-६/२५४/२०१७
नाशिक दिनांक :- २५ /०७/२०१७

प्रति,
सहाय्यक प्रशासन अधिकारी
कनिष्ठ प्रशासन अधिकारी
(जिल्हा परिषद मुख्यालय/पंचायत समिती (सर्व)

**विषय:- सहाय्यक प्रशासन अधिकारी /कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांची आढावा बैठक (दिनांक- ०१/०८/२०१७ सकाळी ११:०० वाजता )**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास सूचित करण्यात येते की, पंचायत समिती स्तरावरील व जिल्हा परिषद स्तरावरील व मुख्यालय स्तरावरील सहाय्यक प्रशासन अधिकारी /कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांची आढावा बैठक दिनांक- ०१/०८/२०१७ सकाळी ११:०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. बैठकीत खालील विषयसूची नुसार आढावा घेतला जाणार आहे. विषय सूचीच्या अनुषंगाने समवेत जोडलेले विहित नमुन्यातील तक्यातील माहिती दोन प्रतीत संगणकीकृत असलेले सोबत घेऊन यावे.

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| १ | लोकआयुक्त प्रकरणे |
| २ | प्रलंबित सेवानिवृत्ती प्रकरणे |
| ३ | निलंबित कर्मचारी प्रकरणे |
| ४ | अनधिकृत गैरहजर प्रकरणे |
| ५ | विभागीय खाते चौकशी प्रकरणे |
| ६ | विभागीय आयुक्त तपासणी मुद्दे |
| ७ | पंचायत समिती स्तरावरील गट-क वर्ग-ड पदांचा आढावा |
| ८ | अपंग कर्मचा-यांना उपकरणे पुरविणे |
| ९ | गोपनिय अहवाल (सन-२०१६-१७) |
| १० | वयाची ५५ वर्ष कर्मचारी यांना सेवेत ठेवणे बाबत आढावा |
| ११ | मत्ता व दायित्व |
| १२ | स्थायित्व प्रमाणपत्र |
| १३ | आपले सरकार पोर्टेल |

वरील आढावा बैठकीस जे सहाय्यक प्रशासन अधिकारी/कनिष्ठ प्रशासन अधिकारी (सर्व) गैरहजर राहतील त्यांची विनावेतन करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**प्रत माहितीसाठी.**
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे वैयक्तिक कार्यालय
**प्रत माहितीसाठी व योग्यकार्यवाहीसाठी.**
साप्रवि-आयटी सेल